महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६५ वे | दिनांक : २५/०२/२०२६ | वार : बुधळवार

## लाडकी बहीण योजनेत महिलांची नावे वगळली; भ्रष्टाचारावर आदित्य ठाकरे यांचा सरकारवर हल्लाबोल



**मुंबई :** राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून पहिल्याच दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शोकप्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सगळेच नेते भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले. मंगळवारी विधानसभेत आणि विधानपरिषदेत वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळाले. यावेळी विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांची नावे वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला.

यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील मुंबईतील वाढत्या प्रदूषणावरून सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, पालिकेला अजून जाग आलेली नाही. शहरातील हवा गंभीर पातळीवर पोहोचली आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केवळ छापील उत्तर देऊ नये, तर प्रत्यक्ष परिस्थिती जाणून बोलावे. कधीतरी खिडकी उघडून बाहेरची स्थिती पहावी, असा टोला ठाकरे यांनी लगावला.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवरून सरकारवर टीका केली. ते म्हणाले, मराठा आरक्षण आणि कर्जमाफीच्या निवडणूकपूर्व घोषणा अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांची नावे वगळण्यात आल्याचा दावा करत, भ्रष्टाचारामुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडत असल्याची टीका ठाकरे यांनी केली. तसेच राज्याच्या इतिहासात प्रथमच विधानसभेत आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षनेता नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, भाजप नेमके कुणाला घाबरत आहे? असा सवालही त्यांनी केला.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांवरही चिंता व्यक्त केली. सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, पुण्यात कॉंग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेचा उल्लेख करत गृहखात्याच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## ‘डिजिटल अरेस्ट’ ही निव्वळ फसवणूक; कायद्यात तरतूद नाही - मुख्यमंत्री

**मुंबई :** देशात आणि राज्यात ‘डिजिटल अरेस्ट’च्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज विधानसभेत आमदार अबू आझमी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत महत्त्वाची माहिती दिली. "कायद्यानुसार ‘डिजिटल अरेस्ट’ नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही. असा कोणताही फोन किंवा व्हिडिओ कॉल आल्यास तो १०० टक्के फ्रॉड आहे हे समजून घ्या," असे स्पष्ट आवाहन मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला केले आहे.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे राज्यातील वाढत्या सायबर गुन्ह्यांचा आणि 'डिजिटल अरेस्ट'चा मुद्दा उपस्थित केला होता. मुंबई आणि अहिल्यानगर सारख्या शहरात नागरिक आपली आयुष्यभराची पुंजी गमावत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. यावर राज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकारकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या गुन्ह्यांच्या कार्यपद्धतीवर सविस्तर भाष्य केले.

"डिजिटल अरेस्ट हा पूर्णपणे खोटेपणा आहे. पोलिस किंवा कोणतीही यंत्रणा अशा प्रकारे व्हिडिओ कॉलवर कोणालाही अटक करू शकत नाही. डिजिटल अरेस्टविरोधात केंद्र सरकार, राज्य सरकार मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. रिंगटोनवरही जाहिराती आहेत. तरीही रोज प्रत्येक दिवशी फसवणूक होत आहे. डिजिटल अरेस्ट प्रकरणात फक्त सामान्य माणूस नाहीतर अनेक मोठे अधिकाही, निवृत्त अधिकारीही अडकले जातात. डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा आहे. कोणालाही फोन आला तर थेट १९३० वर तक्रार करावी," असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## नागपूर महापालिकेत महिलाराज; भाजपचा राज्यातील पहिलाच प्रयोग




**नागपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या नागपूर शहरात भाजपने सर्व महत्त्वपूर्ण पदांवर महिलांची नियुक्ती करत एक नवा इतिहास रचला असून, यामुळे नागपूर महानगरपालिकेत आता खऱ्या अर्थाने 'महिलाराज' अवतरले आहे. राज्यातील आणि देशातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग मानला जात असून, सर्व प्रमुख पदांची सूत्रे एकाच वेळी महिलांच्या हाती सोपवण्याच्या या क्रांतीकारी निर्णयाचे सध्या सर्व स्तरांतून जोरदार कौतुक होत आहे.

राज्यातील महापालिका निवडणुका आणि महापौर निवडीच्या प्रक्रियेनंतर आता सर्वत्र विविध विषय समित्यांच्या सभापतींची घोषणा होत असून, याच अनुषंगाने नागपूर महापालिकेत आज पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. महापौर आणि उपमहापौर पदांनंतर आता स्थायी समिती, परिवहन, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या सर्वच कळीच्या समित्यांच्या सभापतींच्या नावांवर या सभेत अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या सर्व महत्त्वाच्या समित्यांवर महिला नगरसेविकांची नियुक्ती करून भाजपने 'मातृशक्तीचा सन्मान' करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निवडीमुळे महापौर नीता ठाकरे आणि नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांचे हे सक्षम नेतृत्व आता पूर्णतः सज्ज झाले आहे.

महापौर - नीता ठाकरे उप महापौर - लीला हात्तीबेड स्थायी समिती - शिवानी दाणी परिवहन - मंगला खेकरे स्थापत्य - अश्विनी जिचकार अग्निशमन - मायाताई इवनाते आरोग्य - मनीषा अतकरे विधी - निधी तेलगोटे शिक्षण - संतोषदेवी लड्डा गल्लीच वस्ती निर्मूलन - ऋतिक मसराम क्रीडा -दर्शनी धवड महिला व बालकल्याण - सारिखा नांदुरकर जलप्रदाय - दिव्या धूरडे कर आकारणी -सरिता कावरे

नागपूर महानगरपालिकेच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे राजकारणातील महिलांचे वाढते वर्चस्व अधोरेखित झाले असून, प्रशासनाच्या सर्व चाव्या महिलांच्या हाती सोपवून भाजपने एक नवा पायंडा पाडला आहे. नागरी समस्यांची गुंतागुंत सोडवण्यात आणि विकास प्रकल्पांना नवी दिशा देण्यात ही 'महिला शक्ती' कितपत यशस्वी ठरणार, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

संख्याबळाचा विचार करता, नागपूर महापालिकेच्या १५१ जागांपैकी १०८ जागांसह भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांना हे धाडसी निर्णय घेणे सोपे झाले आहे. याउलट, विरोधी पक्षात असलेल्या कॉंग्रेसकडे २९ जागा असून बहुजन समाज पक्षाचे १०, शिवसेनेचे २, राष्ट्रवादी कॉंग्रेसचा १ आणि एका अपक्ष उमेदवाराचा यामध्ये समावेश आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ फेब्रुवारी २०२६



## जिल्हा परीषद शाळेत एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** ७४ जळगाव ता. पैठण येथील जिल्हा परीषद शाळेत २३ फेब्रुवारी सोमवार रोजी " मुले रंगली काव्यात " हा एकपात्री धमाल विनोदी कार्यक्रम बाल कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी सादर करून विद्यार्थी यांची मने जिंकली. या कार्यक्रमात अय्युब पठाण यांनी देशभक्तीपर गीते, भारूड, पोवाडा,विनोदी पाळणे, हुंडाबंदी, कॉपी मुक्त अभियान गीत, आणि शेवटी आई ही कविता मधूर सुरात गाऊन अक्षरशा: उपस्थित विद्यार्थी रडले. आणि या कार्यक्रमाने सर्व उपस्थितांना खिळवून ठेवले.विद्यार्थी यांच्या आगामी होणाऱ्या वार्षिक परीक्षेचा तान-तनाव कमी व्हावे या हेतूने हा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रामपाटील एरंडे होते. तसेच कार्यक्रमास शालेय समितीच्या अध्यक्षा सीमा बजारे, उपसरपंच ऋतुजा एरंडे, दत्तु सुक्रे, शिक्षक अमोल एरंडे, बाबासाहेब मुळे, नारायण सोनवणे, बद्रीनाथ गटकळ, हरिभाऊ घेगडे, कृष्णा नारळकर, बिहारी पाठे, भाऊसाहेब जगधने यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षिका परिसरातील पालकवर्ग व शाळेतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात बालकुमार काव्यसंमेलनाचे आयोजन






**कन्नड (अरुण थोरात) :** येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभाग , अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे शाखा कन्नड , त्रैमासिक तिफण यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिनानिमित्त कन्नड तालुक्यातील विद्यार्थी प्रतिभावंत कविंचे दुसरे बालकुमार मराठी काव्य संमेलनाचे आयोजन मराठी भाषा दिनानिमित्ताने (२७ फेब्रुवारी )रोजी करण्यात आले आहे. कन्नड तालुक्यातील विद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेवून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, लेखन - वाचनांचे त्यांच्यावर संस्कार व्हावेत, उदयोन्मुख कवी - कवयित्री घडावेत या उद्देशाने बाल कुमार काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न होणाऱ्या या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी कवी ऋषिकेश आव्हाळे यांची निवड करण्यात आली असून उदघाटन जान्हवी गाढे या विद्यार्थीनी कवयित्रीच्या हस्ते होणार आहे. आव्हाळे यांनी २५० पेक्षा काव्यलेखन स्पर्धेत सहभाग घेवून १०० पेक्षा अधिक पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. दहा प्रातिनिधीक कविता संग्रहात त्यांच्या कवितेचा समावेश झालेला आहे. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे कविकट्टा मध्ये त्यांनी काव्यवाचन केलेले आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, ज्ञानेश्वर गायके, प्रविण दाभाडे, लक्ष्मण वाल्डे, अनिता राठोड, शुभदा देवरे यांची उपस्थिती लाभणार आहे. या काव्य संमेलनात अदिती चव्हाण, नागेश लाड, संकेत निकम, मुक्ता आव्हाळे, प्रांजल खैरनार, किर्ती गायके, तनुजा पाटील, संस्कृती अकोलकर, अंजली बारगळ, सनाया विश्वासे, अनुजा जाधव, प्रणय विश्वास, अनुजा चव्हाण, मृणाल आव्हाळे, समृद्धी आव्हाळे, तनश्री सोनवणे, गौरी वाघ, वेदिका वाल्डे, धनंजय झाडे आदी विद्यार्थी कवी व कवयित्री सहभागी होणार आहे. या कायक्रमास विद्यार्थी व साहित्य प्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे.

## कु. खूशी मित्तलचा नेट - जेआरएफमध्ये ऑल इंडिया ३६ वा क्रमांक




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जालना येथील जेईएस महाविद्यालयातील गणित विभागाची माजी विद्यार्थिनी कु. खूशी मित्तल हिने डिसेंबर २०२५ मध्ये युजीसी सी.एस.आय.आर द्वारे घेण्यात आलेल्या नेट परिक्षेमध्ये गणित या विषयात ऑल इंडिया ३६ वा रँक घेऊन नेट जेआरएफ ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या यशाबद्दल तिचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री, गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश रोकडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिला पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. सुमंत बिक्कड, प्रा. धनवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. मनिषा सुतार, प्रा. अमोल खांडेभराड, प्रा. मनोज महेर, प्रा. राजेश सरकटे, प्रा. पुष्कर तारो, प्रा. शिवनारायण ताटे, प्रा. अंबरवाडीकर, प्रा. चौधरी, प्रा. बेनिवाल, श्री. नवनाथ गित्ते आदींची उपस्थिती होती.

## भारतीय मूर्तीशास्त्र कार्यशाळा, इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागाचा उपक्रम




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागातर्फे दि. २५ व २६ फेब्रुवारी २०२६ या दोन दिवशीय भारतीय मूर्तीशास्त्र कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेची उद्घाटन व बीजभाषण अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील डॉ. माया पाटील,माजी विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्त्वशास्त्र यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी त्या हिंदू मूर्तीशास्त्राचा उदय व विकास याविषयी भाष्य करणार आहे. या कार्यशाळेत पहिले सत्र डेक्कन कॉलेज, पुणे येथील डॉ. श्रीकांत गणवीर हे मूर्तीचे महत्त्व आणि मूर्तीची प्राचीनता या विषयावर आपले मत मांडणार आहेत. त्यानंतर श्री ओशिन बंब हे मूर्तीशास्त्रातील मुद्रा, आसन आणि वाहन याचे महत्त्व विशद करणार आहेत. दुसऱ्या सत्रामध्ये अष्टदिखपाल व नवग्रहावर या मूर्तीवर डॉ. श्रीकांत गणवीर हे मार्गदर्शन करतील. त्याचप्रमाणे गणपती, कार्तिके आणि सूर्य मूर्तीबद्दल श्री ओशींन बंब हे मार्गदर्शन करतील. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी तिसऱ्या सत्रात डॉ.श्रीकांत गणवीर हे बौद्ध मूर्तीशास्त्र व ओशिन बंब हे स्मारक शिळा, विरगळ, सतीशिळा आणि गदेगाळ याबद्दल सविस्तर माहिती देतील. चौथ्या सत्रामध्ये इतिहास विभागाच्या वस्तुसंग्रहालयामध्ये जैन मूर्तीचे प्रात्यक्षिक श्री ओशिंग बंब हे विद्यार्थ्यांकडून करून घेतील. या कार्यशाळेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संयोजिका डॉ. पुष्पा गायकवाड व इतिहास विभाग प्रमुख डॉ.गीतांजली बोराडे यांनी केले आहे


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ फेब्रुवारी २०२६


## स्वच्छता हीच ईश्वरसेवा - डॉ पद्माकर पिटले



**उमरगा (मुरुम, प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अस्वच्छ परिसरामुळे नागरिक विविध आजाराला बळी पडतात. स्वच्छतमुळे मनुष्याला सुखकर निरोगी आयुष्य लाभते. त्यामुळेच स्वच्छता हीच खरी ईश्वरसेवा आहे.' असे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले यांनी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मौजे व्हांताळ येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलत होते. शिबिरातील स्वंयसेवक ग्रामस्थांच्या वतीने सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ वसंत हिस्सल तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ सूर्यकांत रेवते उपस्थित होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक डॉ सूर्यकांत रेवते यांनी इ कचरा ही अलीकडच्या काळातील मोठी समस्या आहे असे सांगून त्याच्या व्यवस्थापनासंबंधी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ वसंत हिस्सल यांनी संत गाडगे महाराजांचे जीवनचरित्र सांगून समकालीन अर्थव्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ अनिल देशमुख, डॉ भरत शेळके, डॉ सूर्यकांत राठोड, डॉ अतुल बिराजदार, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा मनोज गायकवाड, शिबिरातील स्वंयसेवक विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने

उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ अनिल देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन निरंजन कटके यांनी तर कार्यक्रमाधिकारी डॉ भरत शेळके यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## न्याय विभाग सचिव सुरेश कुमार यांची तोफखाना केंद्रीय विद्यालयाला भेट



**नाशिक रोड :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पीएमश्री' योजनेची अंमलबजावणी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय न्याय विभागाचे संयुक्त सचिव सुरेश कुमार यांनी मंगळवारी तोफखाना केंद्र येथील पीएमश्री केंद्रीय विद्यालय क्र. १, नासिक रोड कॅम्पला

भेट दिली. याप्रसंगी त्यांनी विद्यालयातील आधुनिक शैक्षणिक सुविधा, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी नाशिक जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी सरोज जगताप आणि जिल्हा परिषद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रवीण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य गजराज मीना यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन स्वागत केले. या भेटीदरम्यान सचिव सुरेश कुमार यांनी शिक्षकांशी संवाद साधला. पीएमश्री योजनेअंतर्गत नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी शाळेच्या प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण आणि डिजिटल वर्गांची पाहणी केली.शाळेत राबवल्या जाणाऱ्या शाश्वत विकास ध्येयांना (SDGs) लक्षात घेऊन त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), रोबोटिक तंत्रज्ञान आणि वृक्षारोपण मोहिमेचे कौतुक केले. पीएमश्री योजनेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणे नसून, त्यांना 'भविष्यासाठी सज्ज' नागरिक बनवणे हा आहे, यावर त्यांनी भर दिला.त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीतील आव्हाने समजून घेतली आणि आवश्यक सुधारणांचे निर्देश दिले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी तसेच सीएससी केंद्रांचे पदाधिकारी उपस्थित होते








बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ फेब्रुवारी २०२६


# समानता विरुद्ध मनुवाद : यूजीसी नियम आणि जातीय वर्चस्वाचा प्रतिकार




मच्या देशात जातिव्यवस्था किती घृणास्पद आणि अमानवीय आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. दलितांवर दररोज होणारे अमानवीय अत्याचार आणि त्यांच्याशी होणारी पशूहूनही वाईट वागणूक, याची ओरडून साक्ष देतात. पण जेव्हा जातिव्यवस्थेला मनुवादी विचारधारेचे राजकीय संरक्षण मिळते, तेव्हा ही व्यवस्था किती उग्र, आक्रमक आणि उघडपणे समोर येते, हे आपण गेल्या काही आठवड्यांत स्पष्टपणे पाहिले आहे. जानेवारी महिन्यात प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियावर असे चित्र रंगवले जात होते, जणू देशात एखादे खूप मोठे सामाजिक संकट ओढवले आहे. संपूर्ण देशात 'विद्यापीठ अनुदान आयोग (उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेच्या संवर्धनासाठी), २०२६' अंतर्गत जारी करण्यात आलेल्या नियमावलीला तीव्र विरोध झाला. तथाकथित उच्च जातींचे तरुण अशा भाषेत बोलत होते, जणू त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. जरी विरोध करणाऱ्यांची संख्या कमी होती, तरी त्यांच्या विरोधाचा प्रभाव खूप मोठा होता.

ज्या प्रयत्नाचा उद्देशच भेदभाव रोखणे आहे, त्यालाच विरोध केला जात आहे. वास्तविक, हे पाऊलही अत्यंत तोकडे आणि निरुत्साही आहे, हे

येथे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. तरीही इतका तीव्र विरोध? आपल्या समाजात समानतेसाठी प्रयत्न करणे इतके वाईट झाले आहे का? हे संपूर्ण करण मुळात उच्च जातींच्या असुरक्षिततेचे नाहीच. त्याचा केवळ दाखला देऊन तरुणांना चिथावणी दिली गेली आहे, किंवा असे म्हणा की, त्यांना चिथावल्या गेले आहे. या विरोधाचे खरे कारण 'तक्रारींचा गैरवापर' होईल हे नसून, तक्रारी

पॅनेलवरच्या सदस्याला इथपर्यंत म्हटले की, "जर मी काही प्रश्न विचारले, तर तुम्ही माझ्यावर एससी/एसटी ॲक्ट तर लावणार नाही ना?" जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने यावर स्थगिती दिली, तेव्हा अनेक वाहिन्यांनी हा 'पंडित आणि क्षत्रियांचा विजय' असल्याचे घोषित केले आणि हा 'देश तोडणाऱ्यांचा पराभव' असल्याचे म्हटले.

यूजीसीच्या या नियमावलीवर आतापर्यंत खूप चर्चा झाली आहे. १५ जानेवारीपासून लागू करण्यात आलेल्या (ज्यावर आता सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे) या नियमावलीनुसार, प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेला **'समान संधी केंद्र' (Equal Opportunity Centre)** स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले होते, ज्याचा उद्देश सर्वांसाठी समान संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या केंद्राचे कामकाज चालवण्यासाठी आणि भेदभावाशी संबंधित तक्रारींची चौकशी करण्यासाठी एक **'समानता समिती' (Equity Committee)** स्थापन केली जाईल, ज्याची रचना खालीलप्रमाणे असेल:

या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनेक त्रुटी आहेत. उदाहरणार्थ, यात भेदभावाची कोणतीही स्पष्ट आणि पूर्ण व्याख्या दिलेली नाही. उच्च शिक्षण संस्थांमधील दैनंदिन भेदभावाच्या अनुभवांकडे दुर्लक्ष करून केवळ 'भेदभाव नाही' हे दाखवण्यावरच यात जास्त भर आहे. दुसरी मोठी उणीव म्हणजे, **समानता समितीचे** गठन संस्थाप्रमुखाच्या मनमर्जीवर न सोडता, विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांच्या लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या प्रतिनिधींद्वारे व्हायला हवे, जेणेकरून त्याची विश्वासार्हता टिकून राहील. तसेच, ही

मार्गदर्शक तत्त्वे केवळ विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांपुरती मर्यादित आहेत. ती **IIT, IIM, AIIMS** यांसारख्या केंद्रीय संस्थांना लागू होत नाहीत, ही एक गंभीर त्रुटी आहे. यूजीसीने लोकपाल नियुक्त करण्याचा अधिकार स्वतःकडे ठेवला आहे. परंतु, अनेक विद्यापीठे राज्य कायद्यांतर्गत स्थापन झालेली असल्याने, संघराज्य तत्त्वानुसार लोकपाल नियुक्त करण्याचा अधिकार संबंधित राज्य सरकारांकडे असायला हवा.

अनेक उणिवा असूनही, एका प्रदीर्घ आंदोलनानंतर या टप्प्यावर पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही नियमावली सरकारला वंचित घटकांच्या शिक्षणाची किंवा शैक्षणिक संस्थांमधील त्यांच्या दयनीय स्थितीची काळजी वाटली म्हणून आलेली नाही. उलट, गेल्या दशकातील श्रेष्ठत्वावर आधारित मनुवादी विचारसरणीच्या भाजप सरकारचा काळ वंचित समुदायांच्या, विशेषतः दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांच्या विरोधात हिंसक वातावरण निर्माण करणाराच राहिला आहे. या नियमावलीमागे आंदोलनाचा मोठा इतिहास आहे, ज्याची सुरुवात हैदराबाद विद्यापीठातील **रोहित वेमुलाच्या** 'संस्थात्मक हत्ये'विरोधात न्यायासाठी सुरू झालेल्या आंदोलनापासून झाली. त्यावेळी देशातील संपूर्ण विद्यार्थी समुदाय रस्त्यावर उतरला होता. तरीही अशा घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. दरम्यान, २०१९ मध्ये मुंबईच्या बी.वाय.एल. नायर रुग्णालयात २६ वर्षीय निवासी डॉक्टर **पायल तडवी** हिने जातीय भेदभाव आणि वरिष्ठ सहकाऱ्यांच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली.

रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या मातांनी (क्रमशः राधिका वेमुला आणि आबेदा सलीम तडवी) हा लढा न्यायालयात नेला आणि २०१९ मध्ये जनहित याचिका दाखल केली. या याचिकेद्वारे शैक्षणिक आवारात जातीवर आधारित भेदभाव संपवण्यासाठी एका प्रभावी यंत्रणेची मागणी करण्यात आली होती. याच याचिकेच्या अंतर्गत, मार्च २०२५ मध्ये केंद्र सरकारने परिणाम

म्हणजे 'प्रमोशन ऑफ इक्विटी इन हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन्स रेग्युलेशन्स' (उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेचे संवर्धन नियमावली).

न्यायासाठी प्रदीर्घ कायदेशीर लढाई लढल्यानंतर आणि न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळेच ही नियमावली तयार झाली, तरीही आता सर्वोच्च न्यायालयानेच यावर स्थगिती दिली आहे, हे पाहणे अत्यंत रोचक आहे. न्यायालयाने केवळ तात्पुरती स्थगितीच दिली नाही, तर यावर तातडीने सुनावणीही घेतली. तितकेच खेदजनक म्हणजे, स्थगिती देताना मुख्य न्यायाधीशांनी या नियमांना 'समाजाचे विभाजन करणारे' आणि 'मागे नेणारे' म्हटले आहे. प्रश्न असा आहे की, न्यायालय कोणत्या समाजाच्या विभाजनाबद्दल बोलत आहे? असा समाज जो आधीच जातींमध्ये केवळ विभागलेला नाही, तर अन्यायकारकपणे श्रेणीबद्ध आहे, जिथे तथाकथित उच्च जाती दलितांना आणि आदिवासींना दररोज त्यांच्या दुय्यम स्थितीची जाणीव करून देतात.

विरोध करणारे लोक एक अत्यंत हास्यास्पद तर्क मांडत आहेत की— नियमावलीत आमच्या जातींचे नाव का नाही? त्यांना वाटते की भेदभाव होऊ शकणाऱ्या गटांमध्ये त्यांच्याही जातींचा समावेश असावा. हा तर्क म्हणजे देशातील जातिव्यवस्था आणि तिचे सामाजिक परिणाम नाकारण्याचा प्रयत्न आहे. हे अगदी तसेच आहे जसे 'महिला छळ प्रतिबंधक कक्षात' पुरुषांना का समाविष्ट केले नाही, असे विचारण्यासारखे आहे. जातीय छळाची रचना ऐतिहासिकदृष्ट्या अनुसूचित जाती आणि जमातींच्या विरोधातच निर्माण झाली आहे. हे मान्य करणे म्हणजे कुणाला बहिष्कृत करणे नसून, शतकानुशतके 'सामान्य' मानल्या गेलेल्या विषम वास्तवाला स्वीकारणे आहे. दुसरी ओरड या नियमावलीच्या 'दुरुपयोगा'बद्दल केली जात आहे. जेव्हा जेव्हा शोषितांच्या रक्षणासाठी कायदा येतो, तेव्हा शोषक वर्ग नेहमीच 'दुरुपयोगाचा' कांगावा करतो. हेच आपण 'ॲट्रॉसिटी ॲक्ट'च्या

बाबतीतही पाहिले आहे. हाथरस सामूहिक बलात्कार प्रकरण याचे जिवंत उदाहरण आहे, जिथे न्याय मिळवणे जवळजवळ अशक्य झाले. आजच्या काळात 'अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९' संसदेत मंजूर करून घेणे कदाचित अशक्य झाले असते. कारण सरकारच्या छत्राखाली वर्चस्ववादी जातींची मोठी फळी त्याविरुद्ध उभी राहिली असती, जसे यूजीसीच्या या नियमावलीच्या बाबतीत घडले आहे. हे आपोआप घडलेले नाही, तर आरएसएसच्या (RSS) नेतृत्वाखालील भाजप शासनाचे हे फलित आहे. हा **आरएसएसच्या मनुवादी अजेंड्याचा** विजय आहे.

यूजीसीची ही नियमावली समाज विभागण्याचे साधन नाही, तर शतकानुशतके 'सामान्य' मानल्या गेलेल्या ऐतिहासिक अन्यायाला दिलेले आव्हान आहे. समानतेची भाषा करणे जर आज 'विभाजन' मानले जात असेल, तर आपल्या लोकशाहीवर आणि न्यायव्यवस्थेवर हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. जातीय छळ नाकारणे आणि प्रत्येक संरक्षणात्मक प्रयत्नाला 'दुरुपयोगाच्या' नावाखाली फेटाळणे, ही प्रत्यक्षात त्याच मनुवादी व्यवस्थेची रक्षा आहे जी विषमतेवर पोसली जाते. जर खरोखरच समतावादी आणि एकसंध समाज घडवायचा असेल, तर आधी हे मान्य करावे लागेल की समाज आधीच विभागलेला आहे आणि त्याला जोडण्याचा रस्ता केवळ **न्याय, उत्तरदायित्व आणि समानतेतूनच** जातो. त्यामुळे न्यायालयाने या नियमावलीतील त्रुटी दूर करून अधिक मजबूत मार्गदर्शक तत्त्वे लागू केली पाहिजेत. देशातील पुरोगामी जनतेसमोर हाच प्रश्न आहे की—मनुवादी विचारांचा विजय होणार की सर्व भेदभाव संपवून समतावादी विचार लागू करण्यासाठी देश निर्णायक लढाईत पुढे जाणार?


**लेखक : विक्रम सिंह, संयुक्त सचिव, अखिल भारतीय कृषि मज़दूर यूनियन**

**अनुवाद : प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे, जालना**

**साभार : जनचौक, १० फेब्रुवारी २०२६**